# फेडरेशनचा थकबाकीवर उपाय

**www.mahasahakar.com**

सभासद व बिगर सभासदांकडून देशातील विविध प्रकारच्या वित्तीय संस्था, विविध प्रकारच्या ठेवी स्विकारीत असतात व कर्जवाटप करतात. बँका व पतसंस्था हे काम करण्यासाठीच अस्तित्वात आलेल्या आहेत. सहकारामध्ये फक्त सभासदांकडूनच मिळविलेल्या ठेवींचा विनियोग सभासदांनाच कर्ज वाटपासाठी केला जातो. भारतीय रिझर्व्ह बँकेने ज्यांना बँकींग परवाने दिलेले आहेत, त्या सर्व प्रकारच्या सहकारी बँकांना थकबाकी वसुलीसाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची व मनुष्यबळाची उपलब्धता असते. परंतु महाराष्ट्र राज्यात पतसंस्थांना व त्यात प्रामुख्याने नागरी सहकारी पतसंस्थांना झालेल्या थकबाकीची वसुली करणेसाठी भांडवल व मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात कमतरता भासते. शिवाय सहकार खाते, शासन व उपलब्ध असलेला सहकार कायदा या थकबाकी वसुलीसाठी पतसंस्थांना अपुरा आहे. किंबहुना संपूर्ण यंत्रणा व उद्देश हे पूर्णपणे तोकडे पडले आहेत. याही परिस्थितीत **'बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनने'** पतांस्थांमधील थकबाकीवर मोठ्या कल्पकतेने व आत्मविश्वासाने कृतीशील असा उपाय शोधलेला आहे. व त्या उपायाचे नांव म्हणजेच फेडरेशनची वेबसाईट **www.mahasahakar.com** हे होय.



**www.mahasahakar.com** ही वेबसाईट सहकाराची इत्यंभूत अपडेट माहिती उपलब्ध करुन देते. शासनाचे प्रथमपासून ते आतापर्यंतचे सर्व जी.आर./आदेश/सूचनापत्र या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. सहकाराचा इतिहास सांगणारी व पतसंस्थांची छोट्या माणसांची ही सहकारी चळवळ या वेबसाईटवर अंतर्भूत केलेली आहे. पतसंस्थांना थकबाकी या विषयाने चिंताग्रस्त बनविले आहे. पतसंस्थांची अर्थव्यवस्थाच थकबाकीमुळे अडचणीत आणणारी व दिवसेंदिवस क्लेशदायक होत आहे. पतसंस्थांची चळवळ ही सुखप्रिय जरी वाटत असली, तरी त्यामध्ये झालेली थकबाकी ही पतसंस्थांमध्ये काम करण्याऱ्या कार्यकर्त्यांसाठी सतावणारी व पतसंस्थांच्या आर्थिक त्रुटींच्या चिंतेला आव्हान ठरु लागलेली आहे. सहकारातील चढउतार ठरविण्याऱ्या पतसंस्थांमधील थकीत कर्जदारांचा वेढा आपल्या या फेडरेशनच्या माध्यमातून कल्पकतेने व जबाबदारीने सोडविण्यासाठी पतसंस्थांना यशाच्या पहिल्या पायरीपर्यंत पोहचण्यास यश प्राप्त झाले आहे.. **थकबाकीची समस्या ही अटीतटीची म्हणून पाहणे आवश्यक आहे.** थकबाकीचे आव्हान सहजपणे मोडून काढण्यासाठी आपले हे फेडरेशन आपल्या प्रत्येक पतसंस्थेपर्यंत विश्वासाने पोहचले आहे. जेणेकरुन थकबाकीच्या

ह्या कडव्या समस्येतून आपण सर्व पतसंस्था चालविणारे कार्यकर्ते निश्चितपणे बाहेर पडणार आहोत.

**www.mahasahakar.com** विषयी आपले फेडरेशन अधिक निर्धारपूर्ण आहे. भविष्यातील सहकारातील विविध आव्हानांचा व प्रामुख्याने पतसंस्थांमधील थकबाकीचा सामना करण्यासाठी फेडरेशन अधिक प्रेरित आहे. भविष्याचा वेध घेण्यासाठी व थकबाकी वसुलीसाठी निश्चितपणे उपाय सापडलेला असून, फेडरेशन आपल्या ला आणखी माहिती देण्यासाठी अधिक उत्सुक आहे. यामुळे पतसंस्थांच्या भविष्याविषयी फेडरेशनला यापूर्वी केव्हाही नव्हते एवढे आश्वासीत वाटत आहे. पतसंस्थांमधील थकबाकी व वसुलीसाठी हा उपाय म्हणजे जादूही नाही व अपघातही नाही. यासाठी फेडरेशन आपल्या सर्व पतसंस्थांना उपरोक्त वेबसाईटच्या प्रवाहात सामील करुन घेऊ इच्छिते. **याची आपण कमीत कमी वेळेत सर्व माहितीनिशी सहभागाची मुहूर्तमेढकरावी, व फेडरेशनकडून त्वरित ''पासवर्ड'' घ्यावा ही विनंती.** थकबाकी वसुलीच्या उपाय योजनेचा आपल्या सर्व पतसंस्थांना फायदा व्हावा म्हणून प्रथम फेडरेशनचे सभासद त्वरित व्हावे, व त्यानंतर www.mahasahakar.com चे सुद्धा सभासद होऊन प्रतिवर्षी वर्गणी भरावी. सोबत विहीत नमुन्यातील ठराव व अंडरटेकिंग देणे बंधनकारक आहे. एवढेच काम पतसंस्थांना सुरुवातीला करावयाचे आहे. एकदा वरील सोपस्कर पूर्ण केले की, आपल्या पतसंस्थेकडे **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ व कलम १०१ अन्वये प्राप्त झालेले ॲवार्डस् ,तसेच निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ नुसार चेक बाऊन्सिंगचे ॲवार्डस् सर्टिफाईड करुन त्वरीत फेडरेशनकडे द्यावेत. तद्नंतर** फेडरेशन, पतसंस्थांनी दिलेले सर्व ॲवार्डस् www.mahasahakar.com ह्या वेबसाईटवर विनाविलंब अपलोड करेल. पतसंस्थेला एक ''**पासवर्ड**'' दिला जाईल. या पासवर्डचा वापर कसा करायचा हे सुद्धा आपल्या पतसंस्थेने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास किंवा संचालकांना ह्याबाबत प्रशिक्षित केले जाईल. एवढेच काम आपल्या पतसंस्थेला व फेडरेशनला करावयाचे आहे.

वरीलप्रमाणे प्रत्येक पतसंस्थेस पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर जेव्हा नवीन कर्जदार व त्याचे तथाकथित दोन जामिनदारांसह आपणाकडे कर्ज मागतील, त्यांची **एका क्लिकवर** काही सेकंदात इतर पतसंस्थांमधील थकबाकी असल्यास निदर्शनास येईल. त्यामुळे कर्जदार व जामिनदारांपैकी कोणीही दुसऱ्या एखाद्या पतसंस्थेत ॲवार्डस्च्या माध्यमातून थकबाकीदार म्हणून घोषित झाला असेल, त्याला आपली पतसंस्था इच्छा असून देखील पुन्हा नवीन थकबाकी होणसाठी कर्ज मंजूर करणार नाही.

किंबहुना त्या **नवीन कर्जदाराला व जामिनदारांना पहिल्या पतसंस्थेची थकबाकीची संपूर्ण रक्कम भरावीच लागेल. आणि हीच फेडरेशनच्या www.mahasahakar.com ची किमया आहे.**

**यासाठी सर्व पतसंस्थांनी या वेबसाईटचे सभासद होऊन वरीलप्रमाणे सर्व ॲवार्डस् फेडरेशनकडे सर्टिफाईड करून देणे आवश्यक आहे. सहकारी निबंधकाने आपल्या ह्या योजनेस लेखी संमती दिलेली आहे**. व ते लेखी संमतीचे पत्र प्रत्येक पतसंस्थेस यापूर्वीच पाठविले आहे. शिवाय www.mahasahakar.com वर हे पत्र उपलब्ध करुन ठेवलेले आहे. म्हणून आर्थिक मंदीच्या लाटेवरसुध्दा स्वार होण्यासाठी थकबाकीच्या कचाट्यातून सावरण्याची जबाबदारी आपल्या ह्या फेडरेशनने स्वीकारली आहे. थकबाकीच्या या आव्हानास आम्ही संधी म्हणून बघतो आहे. पतसंस्थांच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याची साद आम्ही यानिमित्ताने सर्व पतसंस्थांना घालतो आहे. पतसंस्थांच्या भविष्याबाबत आम्ही खूप आशावादी आहोत. आणि हा आशावाद असाच जपून ठेवावा यासाठी **थकबाकी वसुलीसाठीच्या ह्या उपाय योजनेत प्रत्येक पतसंस्थेने त्वरित सहभागी व्हावे, असे आवाहन करीत आहोत.** पतसंस्थांचा प्रवास कठीण व दूरवरचा असल्याच्या अनेक आठवणी तुम्हाला आणि आम्हाला आहेत. सहकारी चळवळीतला कार्यकर्ता म्हणून आम्ही या पतसंस्थांच्या सहकारी चळवळीवर मनापासून प्रेम करतो. पतसंस्थांच्या भविष्याची आम्हाला आपल्यासारखीच अगदी मनापासून चिंता आहे. आणि ह्या वेबसाईटच्या पाठीमागचे हेच कारण आहे. पतसंस्थांमधील सभासद व ठेवीदार, कर्मचारी व अधिकाऱ्यांचे कल्याण हाच या मागचा उद्देश आहे. सहकारातील काही नकारात्मक गोष्टी बाजूला ठेऊन आपल्याला वरील कारणास्तव नव्याने सुरुवात करावयाची आहे. यासाठी सर्व पतसंस्थांनी आपले भवितव्य उभे करावयाचे आहे. या कार्यात छोटी आणि मोठी पतसंस्था हा भेद बाजूला सारुन, जनसंपर्काची सहकार चळवळ म्हणून एकत्र येण्याची साद आम्ही सर्व पतसंस्थांना घालीत आहोत. रचनात्मक पद्धतीने कामकाजाचा www.mahasahakar.com या वेबसाईटच्या माध्यमातून थकबाकी वसुलीसाठी वरीलप्रमाणे आराखडा तयार केलेला आहे. पतसंस्थांच्या बाबतीत थकबाकी सारख्या अडचणींवर मात

करण्यासाठी आमची अनेक स्वप्ने आहेत. थकबाकीसारख्या आवाहनाचा मुकाबला करण्यासाठी आम्ही अधिक ठाम आहोत. शिवाय आपले हे **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन** पतसंस्थांच्या भवितव्याचा वेध घेण्यासाठी अधिक सक्षम झाले आहे. छोटया मोठया पतसंस्थांच्या विविधतेत एकता मानण्यासाठी सभासद व ठेवीदारांचा मान राखणारी पतसंस्थांची सहकारी चळवळ आपले वैशिष्ट्य इतरांना मार्गदर्शक ठरण्यासाठी कुठल्याही परिस्थितीत अग्रेसर राहिले आहे.

आणि आपल्या फेडरेशनचा हाच सिद्धांत व अंतिम ध्येय आहे. प्रत्येक पतसंस्थेला असे वाटले पाहिजे की, दुसरी प्रत्येक पतसंस्था माझ्या पतसंस्थेच्या पाठिशी आहे. आणि आपले हे फेडरेशन यासाठी वचनबद्ध आहे. **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या** आतापर्यंत **ज्या पतसंस्था, सभासद झाल्या आहेत किंवा सभासद झाल्या नाहीत, त्या सर्व पतसंस्थांना www.mahasahakar.com च्या थकबाकीच्या वसुलीच्या योजनेत सामील करण्याचा निर्धार आम्ही केलेला आहे.** पतसंस्थांनी येणाऱ्या काही वर्षात परिवर्तनाचे काम यशस्वी केले हे सिद्ध करण्यासाठी फेडरेशन आपणा सर्वांना थकबाकी या कटकटीच्या प्रपंचातून बाहेर काढण्यासाठी मदत करणार आहे. म्हणून www.mahasahakar.com ने थकबाकी वसुलीसाठी वरीलप्रमाणे केवळ उपाय शोधला नाही तर आपल्या मार्फत जरुर आवाज उठविला आहे. यावरुन पतसंस्थांविषयाची कळकळ मायबाप सरकारला भविष्यामध्ये आपोआप दाखवावी लागणार आहे. कारण रोजगार निर्मितीबाबत पतसंस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरलेली आहे. हजारो लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षमपणे उभे केलेले आहे. आणि म्हणूनच अनेक पतसंस्थांमधील आपल्यासारखे सहकारी अभ्यासक व कार्यकर्ते फेडरेशनच्या या कामासाठी त्वरित सहभागी होतील, व इतरांनाही सहभागी करुन घेण्यासाठी अग्रक्रमावर काम करतील, ह्याच आत्मविश्वासाने हे आव्हान बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**